सोलापूर महानगरपालिका
संदर्भ :- १) मा.शासन निर्णय दि.२१ डिसेंबर २०१९
२)जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-१/१४४५ दि.१६/०१/२०२० रोजीची जाहिरात
३) मा.सेवकवर्ग निवड समितीचा दि.१७/०२/२०२० रोजीचा निर्णय.
४) जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-१/२०५ दि.०३/०७/२०१५ चे आदेश.

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/2222
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर. दि. 05 /०३/२०२०

## -नियुक्ती आज्ञापत्र-

सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अनुसुचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेली रिक्त पदे भरणेकामी संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार संदर्भ क्र.२ चे जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जामधून लेखी परिक्षेद्वारे निवड प्रक्रिया पार पाडणेत आलेली आहे .

निवड समितीचे संदर्भ क्र.३ चे निर्णयानुसार खालील तक्त्यात नमूद उमेदवारांची त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयाकडील रिक्त झालेल्या सहाय्यक आरेखक या पदी दि. 06 /०३/२०२० पासून सहावे(६) वे वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० यामध्ये संदर्भ क्र.४ अन्वये मनपाने निश्चित केलेल्या धोरणानुसार वेतनश्रेणीतील मुळ पगार हेच एकवट वेतन र.रु.८,५६०/- यावर करार पध्दतीने प्रथम एक वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरीता नियुक्ती करणेत येत आहे .

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | पदनाम | जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचे कार्यालय | ६ वे वेतनातील Annexure III नुसार प्रारंभिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.अतुल पुंडलिकराव चांदेकर | सहाय्यक आरेखक | अनु.जमाती | नगरअभियंता विभाग | रू.८,५६०/- |

उपरोक्त तक्त्यात नमुद उमेदवारांची आस्थापनेवरील नियुक्ती खालील शर्ती व अटीस अधिन असेल.

१) सदर उमेदवार हजर झाल्यापासून एक वर्षाचे परिविक्षा कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास त्यांना कोणतीही पुर्वनोटीस न देता कमी करणेत येईल.

२) सदर पदाचे रु.५२००-२०२०० ग्रेड पे २८०० या वेतनश्रेणीतील मूळ वेतन हेच एकवट वेतन रु.८,५६०/- यावर करार पध्दतीने प्रथम एक वर्षाकरीता व एक वर्षानंतर सदर पदाचे नियमित वेतनश्रेणीवर वेतन मिळेल.

३) निवडीत उमेदवारांनी नोकरीत रुजू झालेपासून एक महिन्याच्या कालावधीत मेडिकल बोर्ड, सोलापूर महानगरपालिका, यांचेकडील शारीरिक स्वास्थ प्रमाणपत्र(फिजीकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे आवश्यक आहे.

४) निवडीत उमेदवारांना महानगरपालिकेचे सध्या अस्तित्वात असलेले नोकरीविषयक अथवा त्यानंतर वेळोवेळी अमलात येणारे नियम, पोटकानून, विनियम, स्थायी आदेश इत्यादी लागू राहतील.

५) निवडीत उमेदवारांना महानगरपालिकेची नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी २ महिन्याची पूर्वनोटीस देणे आवश्यक आहे किंवा २ महिन्याच्या मूळ पगाराइतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.

६) निवडीत उमेदवारांची सदरची नेमणूक ही संपूर्णत: हंगामी स्वरुपात असल्याने, त्यांना कोणतेही कारण न दर्शविता नोकरीतून नोटीस न देता कमी करणेत येईल.

७) नियुक्तीचे ठिकाणी हजर होताना ते जर अन्य ठिकाणी नोकरीस असतील तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा हजर करणे आवश्यक आहे.

८) निवडीत उमेदवारांनीशैक्षणिक पात्रतेसंबंधी व इतर कागदपत्रे/प्रमाणपत्राबाबत सोलापूर महानगरपालिकेची दिशाभूल केली आहे अथवा खोटी कागदपत्रे सादर केलेली आहेत असे यापूढे केव्हाही निदर्शनास आल्यास त्यांना तात्काळ नोकरीतून कमी करण्यात येईल.

९) निवडीत उमेदवारांनी सदर नेमणूकीचे आज्ञापत्र मिळालेपासून ७ (सात) दिवसाचे आत कामावर रुजू होणे आवश्यक आहे. सदरचे आज्ञापत्र मिळूनही ते सबळ कारणामुळे हजर राहू शकत नसतील व ती कारणे मा.आयुक्तांचे समाधान करु शकत नसतील तर सेवकवर्ग निवड समितीच्या दि.१३/०२/१९८० चे मंजूर नियमानुसार त्यांचे नांव निवडयादीतून कमी करण्यात

येईल व त्यानंतर त्या पदावरील नेमणूकीबाबत त्यांची कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०) उपरोक्त नियुक्त कर्मचाऱ्यास, शासन निर्णय क्र.अनियो-१०५/१२६/सेवा-४ दि.३१/१०/२००५ मधील तरतुदीनुसार "नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील."

११) निवडीत उमेदवाराचे पोलिस खात्याकडील चारित्र्य पडताळणी दाखल्यामध्ये शासकीय/महानगरपालिका सेवेसाठी अयोग्य आहे असे तपासणीअंती आढळून आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१२) रुजू होण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

१३) निवडीत उमेदवारांनी शासनमान्य MS-CIT अथवा DOEACC संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संगणक ज्ञानाची नमुद अर्हता धारण करीत नसलेल्या उमेदवारांना सदर अर्हता नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

१४) निवडीत उमेदवारांनी एक वर्षाकरीता एकवट वेतनावर काम करणेस तयार असलेबाबतचे विहीत स्टॅम्पपेपरवर हमीपत्र सामान्य प्रशासन विभागाकडे दिल्यानंतर विभागप्रमुखांनी त्यांना रुजू करुन घ्यावे.

मा.आयुक्त यांचे
मान्यतेने

(अजयसिंह पवार)
उप आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

प्रति :-

श्री अतुल पुंडलिकराव चांदेकर
ईस्तारीनगर, बेलोरारोड
खापरी, ता.घाटंजी, यवतमाळ-४४५३०१.

प्रत :-

१) नगर अभियंता विभाग
२) मुख्यलेखापाल
३) अंतर्गत लेखापरिक्षक
४) संगणक विभाग
५) आस्था-४/७, सा.प्र.विभाग